**ठळक बातम्या**

- ग्राहकांना हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी आणि त्यांची दिशाभूल रोखण्यासाठी सरकार कटीबद्ध असल्याचं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांचं प्रतिपादन

- तेलंगणामध्ये ६४ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

- चंद्रपूर जिल्ह्यात तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू

**आणि**

- महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा दिल्ली कॅपिटल्सचा निर्णय

**<><><><><>**

ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी तसंच त्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्री  प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे, जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आयोजित एका वेबिनारला ते संबोधित करत होते. ग्राहकांचं केवळ संरक्षणच नव्हे तर ग्राहकांची समृद्धी हे देखील सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. प्रदूषण,जैवविविधता आणि हवामानबदलाच्या आव्हानाला समोरं जाण्यासाठी आरोग्यदायी आणि शाश्वत जीवनशैली अंगिकारण्यासाठी सर्वांना पर्याय उपलब्ध करुन देणं आवश्यक असल्याचं जोशी म्हणाले.

ग्राहकांच्या तक्रारीचं निवारण करण्यासाठी कायदेशीर लढाई सुरु करण्यापूर्वीच पर्याय उपलब्ध करुन देण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न

असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी या वेबिनारमधे  सांगितलं. राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनचा उल्लेख करुन त्यांनी सांगितलं की गेल्या १० वर्षात त्याचा उपयोग करणाऱ्यांची संख्या १० पटींनी वाढली आहे.

<><><><><>

देशाचा ईशान्य प्रदेश इतर भागांशी जोडून विकास, शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्याला  केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सांगितलं. मिझोरममधल्या  आसाम रायफल्सच्या मुख्यालयाच्या स्थानांतर कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं ते म्हणाले. अनेक वर्ष प्रलंबित असलेलं हे स्थानांतर राजधानी ऐझवालमधून झोखावसंग या ठिकाणी करण्यात आलं.

<><><><><>

गेल्या दहा वर्षात आसाममधले दहा हजारपेक्षा जास्त युवक शस्त्र टाकून मुख्य प्रवाहात आले असून आसाम प्रगतीपथावर आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं. गोलघाट जिल्ह्यातल्या डेरगाव इथल्या पोलीस अकॅडमीच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन आज अमित शाह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुढच्या टप्प्याची पायाभरणीही त्यांनी यावेळी केली. ही अकॅडमी देशातली सर्वश्रेष्ठ अकॅडमी होईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.

<><><><><>

विद्यार्थ्यांची निर्मिती असलेल्या स्टार्टअपला सरकार भऱीव सहकार्य करेल, असं आश्वासन केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिलं. हायपरलूप प्रकल्पाच्या उभारणीत तामिळनाडूच्या थैयूर इथल्या भारतीय प्रौद्योगिकी संस्थेतल्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या विद्यार्थांशी वैष्णव यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत तामिळनाडू राज्य देशात दुसऱ्या स्थानावर असल्याचं सांगत त्यासाठी राज्य सरकारच्या धोरणांचं वैष्णव यांनी कौतुक केलं.

<><><><><>

प्रख्यात पॉडकास्ट निर्माते लेक्स फ्रिडमन यांनी त्यांच्या पॉडकास्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मुलाखत घेतली आहे. ही मुलाखत उद्या समाजमाध्यमावर प्रसारित केली जाणार असून, ती सर्वांनी ऐकावी, असं आवाहन मोदी यांनी केलं आहे. तीन तासांच्या या प्रदीर्घ मुलाखतीत प्रधानमंत्री मोदी यांच्या आयुष्यावर सविस्तर प्रकाश टाकला आहे.

<><><><><>

तेलंगणा मध्ये बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पार्टी- माओवादी या संघटनेच्या ६४ सदस्यांनी आज भद्रादि कोठागुडम जिल्ह्यात पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. यात ४८ पुरुष तर १६ महिला माओवाद्यांचा समावेश

आहे. यामुळे गेल्या दोन महिन्यात आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांची संख्या १२२ वर पोहोचली आहे.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात कवंडे इथं जंगलात नक्षलवाद्यांनी पुरलेली स्फोटके पोलिसांनी नष्ट केली. ९ मार्चला गडचिरोली पोलिस दलाने या ठिकाणी पोलिस ठाण्याची उभारणी केली होती.  पोलिस मदत केंद्रापासून जवळच ही स्फोटके पुरलेली होती.

<><><><><>

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला नाशिक जिल्हा न्यायालयानं दिलेल्या स्थगिती निर्णयाच्या विरोधात माजी न्यायाधीश सतीश वाणी यांनी उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी येत्या मंगळवारपासून सुनावणी होईल.

<><><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातल्या नागभीड इथल्या घोडा-झरी तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू झाला आहे. आज दुपारी ही घटना घडली. हे तरुण चिमूर तालुक्यातल्या साटगाव कोलारी इथले होते. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं सर्व युवकांचे मृतदेह  बाहेर काढले असून यातले चार जण एकाच कुटुंबातली भावंडं आहेत.

<><><><><>

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचा नामविस्तार छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ असा करण्याच्या मागणीला आज झालेल्या अधिसभा सदस्यांच्या बैठकीत सदस्यांनी विरोध केला. विद्यापीठाचा नामविस्तार झाला तर त्याचं

इंग्रजी लघुरुप वापरलं जाईल, त्यामुळे शिवाजी महाराजांचा अपमान होईल, असं मत अधिसभा सदस्यांनी मांडलं. तासाभराच्या विरोधानंतर कुलगुरुंनी नामविस्ताराच्या विरोधातला प्रस्ताव स्वीकारला.

<><><><><>

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा  सदेह वैकुंठ गमन अर्थात बीज सोहळा उद्या, रविवारी क्षेत्र देहू इथं होत आहे. यंदा तीनशे पंच्याहत्तरवा बीज सोहळा असून या सोहळ्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

<><><><><>

चंडीगढ इथं शिवसेना जिल्हा प्रमुखाच्या हत्ये प्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. मुक्तसर जिल्ह्यात या आरोपींसोबत पोलिसांची चकमक झाली, त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मंगत राय यांचा शुक्रवारी रात्री गोळीबारात मृत्यू झाला होता.

<><><><><>

पाकिस्तानमधल्या बब्बर खालसा इंटरनॅशनल या दहशतवादी संघटनेचा सदस्य हरविंदर सिंग उर्फ रिंडा याच्या हत्येप्रकरणी पंजाब पोलिसांनी आज आणखी तीन जणांना चंडीगडमध्ये अटक केली. यापैकी जगजीत सिंग उर्फ जग्गी आणि शुभम खेळबुडे हे दोघे नांदेड इथले रहिवासी आहेत तर तिसरा आरोपी पंजाबचा रहिवासी आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी शस्त्रही जप्त केली.

<><><><>

रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्धविरामाची चर्चा सुरू असतानाच दोन्ही देशांनी काल परस्परांवर जोरदार हवाई हल्ले केले. दोन्ही बाजूंनी प्रत्येकी शंभर ड्रोन सोडल्याचं वृत्त आहे. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या हल्ल्यामुळे जवळपासच्या विमानतळावरची उड्डाणं रद्द करण्यात आली होती. विशेष म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांच्याशी युद्धविराम करण्याविषयी नुकतीच चर्चा केली होती.

दरम्यान, युद्धविराम करण्यासाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यावर दबाव आणावा असं आवाहन ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी जागतिक नेत्यांना केलं आहे. पुतीन यांना आज ना उद्या चर्चेत सहभागी व्हावेच लागेल असं ते म्हणाले.

<><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. मुंबई इंडियन्स विरुद्धचा हा सामना मुंबईत ब्रेबॉर्न मैदानावर सुरू आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबईच्या २ षटकात बिन बाद ३ धावा झाल्या होत्या.

हरमनप्रीत कौर ही मुंबईची तर मेग लॅनिन्ग दिल्लीची कर्णधार आहे. मुंबईनं या मैदानावर ३ सामने खेळले आहेत. पण दिल्लीच्या संघानं इथं सराव वगळता एकही सामना खेळलेला नाही.

<><><><>

इटलीच्या तुरीन इथं सुरू असलेल्या विशेष हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी भारतीय खेळाडूंनी आणखी १५ पदक जिंकली आहेत. भारताच्या खात्यात आता २४ पदकं जमा झाली आहेत. दीपक ठाकूर आणि गिरीधर यांनी सुवर्णपदक तर अभिषेक कुमार, राधा देवी, जियारा पोर्टर यांनी रौप्य पदक जिंकलं आहे.

**<><><><><>**

२०२६ सालच्या पद्म पुरस्कारांसाठीची नामांकन प्रक्रिया आजपासून सुरु झाली आहे. देशाचे सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्म विभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या पुरस्कारांसाठी येत्या ३१ जुलैपर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करता येतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी आकाशवाणी वर ‘मन-की-बात’ कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना येत्या २८ मार्च पर्यंत १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**